MHND160015572022

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२४६/२०२२**
**अशोक तवर व एक वि. निरंक**

# आदेश नि.क्र.१ खाली

**(दिनांक ०९.१२.२०२२)**

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार क्र.१ व २ यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ नियम ३ प्रमाणे वारस दाखला (वारसा प्रमाणपत्र) मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**२. अर्जदारांचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणेः-**

अर्जदारांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. मयत **कान्होपात्रा भ्र. तान्हाजी तवर, रा. शिरड ता. हदगांव जि. नांदेड** येथील रहिवाशी होत्या आणि त्या **दि.२९/०७/२०१०** रोजी मयत झाल्या. अर्जात दर्शविल्याप्रमाणे मयत कान्होपात्रा भ्र. तान्हाजी तवर यांची अर्जदार क्र.१ व २ ही मुले वारस आहेत. मयत कान्होपात्रा भ्र. तान्हाजी तवर, यांची आई लक्ष्मीबाई ईजळकर ही सन १९९० मध्ये मयत झाली आहे. तसेच मयत कान्होपात्रा भ्र. तान्हाजी तवर, यांचे पती नामे तान्हाजी पि. राजाराम तवर हे दि.०१.१२.१९९४ मध्ये मयत झाले आहेत. मयत कान्होपात्रा भ्र. तान्हाजी तवर, यांचे अर्जदार क्र.१ व २ हे कायदेशिर वारस असल्याबाबतचा वारस दाखला (वारसा प्रमाणपत्र) मिळावे म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये गैरअर्जदार हे निरंक आहेत.

**३.** अर्जदारांच्या अर्जावरुन अर्जातील मागणी संदर्भात कोणाचा काही वाद असल्याचा तो मांडण्याची संधी मिळावी म्हणून जाहीर नोटीस काढण्याचा आदेश झाला. त्यानुसार सदर जाहीर नोटीस दैनिक सत्यप्रभा मध्ये दि.२२/१०/२०२२ रोजीच्या आवृत्तीत प्रसिध्द झाली. तसेच जाहिरनामा (नि.क्र.१३) जारी करण्यात आला. त्यानंतर आजतागायत सदर अर्जाबद्दल हरकत घेण्यासाठी अथवा आपले म्हणणे मांडण्यासाठी कोणीही व्यक्ती न्यायालयात हजर झाली नाही.

**४.** अभिलेखावरील अर्जदार क्र.२ गणेश पि. तान्हाजी तवर यांनी पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.१४), मयत **कान्होपात्रा भ्र. तान्हाजी तवर,** यांचे मृत्यु प्रमाणपत्र (नि.क्र.०६) व मयत कान्होपात्रा भ्र. तान्हाजी तवर यांचे पती तान्हाजी राजाराम तवर यांचे मृत्यु प्रमाणपत्र (नि.क्र.१८) दाखल केले आहे. तसेच अर्जदार यांनी त्यांचे आधार कार्ड इत्यादी कागदपत्रांच्या छायांकीत प्रती दाखल केल्या आहेत. सदर सर्व कागदपत्रांवरुन अर्जदार क्र.१ व २ हे मयताचे वारस असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अशा परिस्थीतीत अर्जदार क्र.१ व २ यांच्या नावे सदर वारस दाखला मंजुर होणेस पात्र आहे. सबब मी पुढील आदेश पारीत करीत आहेः

## आदेश

१. बॉम्बे रेग्युलेशनच्या नियम ३ प्रमाणे, मयत **कान्होपात्रा भ्र. तान्हाजी तवर, रा. शिरड ता. हदगांव जि. नांदेड** यांचे कायदेशिर वारस असल्याबद्दलचा वारस दाखला नमुना- ब प्रमाणे अर्जदार क्र.१ व २ यांच्या नावे देण्यात यावा.

२. बॉम्बे कोर्ट फीस ॲक्ट, नियमाप्रमाणे कोर्ट फीस वसुल केल्यानंतर वारस दाखला देण्यात यावा.

३. सदरील प्रकरण बंद करण्यात येते.

RAMCHANDRA DATTATRAY MANE
Digitally signed by RAMCHANDRA DATTATRAY MANE
Date: 2022.12.12 13:15:01 +0530

दिनांक : ०९/१२/२०२२

**(रामचंद्र दत्तात्रय माने)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
हदगांव जि. नांदेड.

## प्रमाणपत्र

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील सर्व मजकुर मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

लिपीकाचे नाव - श्री. गायकवाड एन.एस.
न्यायालयाचे नाव - सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग - १, हदगांव.

| | |
|---|---|
| आदेश दिनांक | : ०९.१२.२०२२. |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली तारीख | : ०९.१२.२०२२. |
| आदेश / न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख | : १२.१२.२०२२. |